| MHLA150010522019 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | १८/११/२०१९ |
| | नोंदणी दिनांक | : | १८/११/२०१९ |
| | निकाल दिनांक | : | ०१/११/२०२३ |
| | कालावधी | : | ०३व. ११म. १३दि. |

**भाग– अ**

फॉर्म क्र. XXXII

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय **VI** परिच्छेद क्र. ४४ (**I**))

| | | |
|---|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र.१ चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी – प्रशांत पी. काळे यांच्या समोर.) | |
| | **नियमीत फौजदारी खटला क्र. १०२/२०१९**<br>नि.क्र. | |
| फिर्यादी | महा. शासन द्वारा– पोलीस ठाणे चाकूर, ता.चाकूर जि. लातूर | |
| सहा. सरकारी अभियोक्ता | | श्री. आर.जी. गिरी |
| आरोपी | १. | उमाकांत प्रभाकर मोठे,<br>वय – ४४ वर्ष, धंदा – शेती, |
| | २. | रमाकांत प्रभाकर मोठे,<br>वय – ४७ वर्ष, धंदा – शेती, |

| | | |
|---|---|---|
| | ३. | गणेश प्रभाकर मोठे,<br>वय – ४० वर्ष, धंदा – शेती, |
| | ४. | लिंगेश्वर सदानंद मोठे,<br>वय – ३१ वर्ष, धंदा – शेती,<br>वरील सर्व रा. शिवनखेड बु. ता. चाकूर जि. लातूर |
| आरोपींचे विधीज्ञ | | श्री.डी.पी. चाकुरकर. |

**भाग – ब**

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय **VI** परिच्छेद क्र. ४४ **(ii)**)

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ०७/०९/२०१९ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०७/०९/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | १८/११/२०१९ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | १७/०३/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०१/११/२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | ०१/११/२०२३ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०१/११/२०२३ |
| जर, दोषसिध्दी झाली असेल तर शिक्षा फर्माविण्याचा दिनांक | – – |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपी चा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कलम | दोषमुक्ती किंवा दोषसिध्दी | शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | उमाकांत प्रभाकर | ०८/०९/२०१९ | फौ.प्र.सं. कलम | भा दं वि | दोषमुक्त. | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मोठे | | ४१(१) प्रमाणे नोटीस. | कलम ३२४,३२३,५०४, सह कलम ३४. | | - | - |
| | रमाकांत प्रभाकर मोठे | --"-- | --"-- | --"-- | --"-- | - | - |
| | गणेश प्रभाकर मोठे | --"-- | --"-- | --"-- | --"-- | - | - |
| | लिंगेश्वर सदानंद मोठे | --"-- | --"-- | --"-- | --"-- | - | - |

## भाग 'क'

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय **VI** परिच्छेद क्र. ४४ (**iii**))

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.

**–अभियोगपक्ष –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०१ | नागनाथ बाबुराव मोठे | फिर्यादी |

ब– **–बचावपक्षाचे साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | -- | – |

क– **–न्यायालयीन साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | -- | – |

अभियोगपक्ष/ बचावपक्ष / न्यायालय, यांचे निशाणी यादी

अ– **–अभियोगपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाचा सा.क्र. १ नि.क्र. २७ | फिर्यादी |

ब – **–बचावपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क – –न्यायालयाचे निशाणी क्रमांक –**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड – न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी**

| **अनु.क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| | -- | -- |

इ. **–भौतिक वस्तु–**

| अनु.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| ०१ | -- | -- |

**– न्यायनिर्णय –**

(पारीत दि.०१.११.२०२३)

प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२४,५०४ सह कलम ३४ अन्वये अपराध केले बाबत खटला चालवण्यात आला.

अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे.

२. दि.०७.०९.२०१९ रोजी सकाळी ०९.०० वा. फिर्यादी नागनाथ बाबुराव मोठे रा. शिवणखेड बु. ता. चाकूर जि. लातूर हा शिवणखेड येथील बसस्थानक येथे असतांना सर्व आरोपी तेथे जाऊन फिर्यादीस, तु आमचे शेतातुन पाईप लाईन का केलास, म्हणून व मागील शेतीचे वादाची कुरापत काढून शिवीगाळ करुन लाथा बुक्यांनी मारहाण केली. आरोपी उमाकांत याने फिर्यादीस दगडाने दोन तीन ठिकाणी त्यामुळे फिर्यादीचे डोके फुटून रक्त निघाले. तसेच फिर्यादीच्या पोटावर कशाने तरी मारल्याने खरचटुन पोटावर जखम झाली तसेच उजव्या खांदयावर पण जखम झाली. सुभाष शंकर साके, नरसिंग विठ्ठल कोळगावे

व बाबुराव मोठे यांनी भांडण सोडविले. त्यामुळे फिर्यादीने प्रस्तुतची फिर्याद आरोपींविरुध्द दिली.

४. प्रस्तुतच्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिस ठाणे चाकूर येथे गु.र. क्रमांक २६५/२०१९ भा.दं.वि. कलम ३२४,३२३,५०४ सह कलम ३४ अन्वये नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री. बी.बी. मामडगे पोलीस नाईक ब.नं. १२७६, पोलीस ठाणे चाकूर, यांनी तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले आणि तपास पूर्ण झालेनंतर आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

५. वरील गुन्हयास अनुसरुन आरोपींविरुध्द दोषारोप नि.क्र.१५ नुसार ठेवून त्यास आरोपांचे स्वरुप समजावून सांगितले असता आरोपींनी त्यांचेवरील आरोप नाकारुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली. आरोपींविरुध्द कांहीही पुरावा न आल्याने फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणेचे बयाण नोंदविण्यात आले नाही.

६. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.०७.०९.२०१९ रोजी सकाळी ०९.३० वा. मौजे | |

| | | |
|---|---|---|
| | मौजे शिवणखेड बु. ता. चाकूर येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस ईच्छापुर्वक दगडाने मारहाण करुन दुखापत केली, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी. |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन ईच्छापुर्वक फिर्यादीस शिविगाळ करुन अपमानित केले, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी. |
| ३. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते |

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>मुद्दे क्र. १ व २ करीता</u> –

७. चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दे क्र. १ व २ हे एकत्रीतरित्या चर्चेस घेण्यात आलेले आहेत.

८. फिर्यादी नागनाथ बाबुराव मोठे (अ.सा.क्र.१) याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, घटना ही दि. १९.०७.२०१९ रोजी सकाळी ०९.३० वा. बसस्थानकाजवळ घडली. त्याच्यात व आरोपींत शाब्दीक किरकोळ वाद झाला होता, त्याशिवाय कांही झाले नाही. फिर्यादीने पोलीस ठाण्यात अर्ज दिला होता, त्यावर त्याची सही असून, त्यातील मजकूर त्यास माहीत नाही. सदरील साक्षीदार अभियोगपक्षाच्या कथनास दुजोरा देत नसल्याने

अभियोगपक्षातर्फे त्यांना उलटतपासात विचारण्यात येणारे सुचक प्रश्न विचारण्यात आले, अभियोगपक्षातर्फे विचारण्यात आलेल्या सर्व सुचक प्रश्नांना त्याने नकारार्थी उत्तर दिली. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात फिर्यादीने ही बाब मान्य केली की, प्रस्तुत प्रकरणाबाबत त्याची व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे.

१०. अभिलेखाचे अवलोकन केले. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात आरोपींनी त्याला दगडाने व लाथा बुक्यांनी मारहाण करुन दुखापत केली तसेच शिविगाळ करुन अपमानित केले, या बाबी कथन केलेल्या नाहीत. जरी, आरोपीतर्फे घटनास्थळ पंचनामा आणि वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केले, तरी त्यावरुन आरोपींनीच फिर्यादीस मारहाण करुन दुखापत केली होती व शिवीगाळ करुन अपमानित केले होते, ही बाब शाबीत होत नाही. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात त्याची व आरोपींची न्यायालयाबाहेर प्रस्तुत प्रकरणात तडजोड झालेली असल्याचे कथन केलेले आहे. त्यामुळे वरील सर्व चर्चेवरुन अभियोगपक्षाचा महत्वाचा साक्षीदार स्वतः फिर्यादी हा अभियोगपक्षाला सहकार्य न केल्याने आरोपींनी वर नमुद गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाला निःसंशयपणे शाबीत करता आली नाही. वरील सर्व कारणावरुन व चर्चेवरुन मी मुद्दे क्र. १ व २ चे

उत्तर नकारार्थी देऊन मुद्दा क्र.३ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | दोन्ही आरोपींची भारतीय दंड विधान कलम ३२४,५०४ सह कलम ३४ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जात मुचलका रद्दबातल करण्यात येत आहे. |
| ३. | सदरील न्यायनिर्णयाची प्रत ही जिल्हादंडाधिकारी लातूर यांना पाठविण्यात येत आहे. सदरील प्रत जिल्हादंडाधिकारी लातूर यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ती प्रत फिर्यादीस द्यावी.<br>(सदरहू न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

दिनांक – ०१.११.२०२३

(प्रशांत पी. काळे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.